# कार्यालय – महानगरपालिका अमरावती

## कोटेशन नोटीस

दिनांक. 12/07/2022

महानगरपालिकेला PMSVANIDHI अंतर्गत कर्ज प्राप्त झालेले आहे त्या सर्व पथविक्रेत्यांचे सामाजिक-आर्थिक online वर आधारित सर्वेक्षण करावयाचे आहे. सदर सर्वेक्षण शासनाने दिलेल्या link/id password नी करावयाचे आहे. ज्यामध्ये यादीमधील पथविक्रेत्यांना संपर्क करून त्यांच्या प्रत्यक्ष व्यवसायाच्या जागी किंवा घरी जाऊन त्यांचे व त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्याची माहिती पोर्टल वर भरावयाची आहे. तसेच दर महिन्याला पहिल्या आठवड्यामध्ये नियोजित कॅम्प मध्ये सर्व पात्र लाभार्थ्यांना उपस्थित ठेवावयाचे आहे.

सध्या स्थितीमध्ये ३३०० पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण करावयाचे असून ज्या प्रमाणात बँक मार्फत कर्ज वितरीत करण्यात येईल त्याप्रमाणात सर्वेक्षण संख्येमध्ये वाढ होईल व त्या सर्वांचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे सर्वेक्षण करणेकरिता खालील दिल्याप्रमाणे काम करावयाचे आहे. त्याकरिता इच्छुक नोंदणीकृत संस्था/CLF/ ALF अर्ज सादर करू शकतात. तरी ज्यां नोंदणीकृत संस्था/CLF/ ALF काम करण्यास इच्छुक असेल त्यांनी सीलबंद दरपत्रक शहर प्रकल्प अधिकारी, NULM विभाग महानगरपालिका अमरावती यांचे यांचे कार्यालयात दि. 18/07/22 ला दुपारी / सकाळी 12:00 वाजेपर्यंत सादर करावेत. नंतर आलेले दरपत्रक स्वीकारल्या जाणार नाहीत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजे रक्कम |
|---|---|---|
| १. | पथविक्रेत्यांचे सामाजिक-आर्थिक online सर्वेक्षण करणे. | ५० /- प्रती लाभार्थी |
| | | |

अटी व शर्ती

१) आदेश मिळताच सर्वेक्षण तत्काळ सुरु करावे लागेल व तसा करारनामा मा. शहर प्रकल्प अधिकारी यांचे सोबत करण्यात यावा. अन्यथा प्रती दिवस रु.५०० या प्रमाणात दंड आकाराला जाईल व सदर रक्कम अंतिम बिलामधून वजा करण्यात येईल.

२) सदर दर प्रती लाभार्थी नुसार देण्यात येईल ज्यामध्ये सर्व कर हे सर्वेक्षण करण्याऱ्यास अदा करणे आवश्यक राहील.

३) निविदाधारक संस्था/CLF/ ALF यांनी नोंदणी प्रमाणपत्र, मागील तीन वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल, PAN CARD, घटना, ठराव व विनंती अर्ज सादर करावा लागेल.

४) सर्वेक्षणाकारिता आवश्यक मनुष्यबळ हे सदर संस्था/ALF/CLF यांनी स्वत उपलब्ध करावे ज्यांचा महानगरपालिका सोबत कोणताही संबंध राहणार नाही.

५) सदर निविदेमध्ये बदल करणे पूर्णतः रद्द करणे याचे सर्व अधिकार शहर प्रकल्प अधिकारी यांचे राहतील व ते निविदाधारकास बंधकारक राहील.

६) सर्वेक्षण करिता लागणारे सर्व साहित्य (स्मार्ट फोन/मोबाईल) सर्वेक्षण संस्था यांना स्वतः उपलब्ध करावे लागेल. महानगरपालिका कडून सर्वेक्षण करिता कोणतेही मनुष्यबळ साहित्य पुरविण्यात येणार नाही.

७) कामाचा मोबदला म्हणून निर्धारित केलेल्यानुसार शहरातील जेवढ्या पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण पूर्ण केले व योजनेचा लाभ देण्याकरिता कागदपत्रे गोळा केली त्याप्रमाणात देण्यात येईल.

Scanned with CamScanner

८) लाभार्थी/पथविक्रेता संदर्भातील कोणतेही कागदपत्र, वाद, विवाद व शंका निर्माण झाल्यास त्या संदर्भात अंतिम निर्णय शहर प्रकल्प अधिकारी महानगरपालिका अमरावती यांचा राहील.

९) सर्वेक्षण मध्ये प्राप्त झालेली माहिती महानगरपालिका व्यतिरिक्त इतर कुणालाही देता येणार नाही व पूर्णतः गोपनीय राहील, याची पूर्ण दक्षता घ्यावी लागेल.

१०) निविदेमध्ये पदाधिकाऱ्यांचा सहभाग नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य राहील. नियुक्तीच्या दिनांकपासून कार्यादेश एक वर्षाचा राहील.

११) ज्या निविदाधारकाचे दर हे सर्वात कमी असतील त्या निविदाधारकास कार्यादेश देण्यात येईल.

१२) मंजूर निविदाधारकास अनामत रक्कम ३% मा.आयुक्त महानगरपालिका अमरावती यांचे नावे धनादेश द्वारे जमा करावी लागेल व संपूर्ण सर्वेक्षण झाल्यानंतर निविदाधारकास परत देण्यात येईल.

१३) मंजूर निविदा धारकाने पथविक्रेता सर्वेक्षण झाल्यानंतरची संपूर्ण माहिती महानगरपालिकेस उपलब्ध करून द्यावी लागेल.

१४) निविदा धर्काचे कामकाज सुरु असतांना कोणत्याही प्रकारचे न्यायालयाने स्थगिती दिल्यास किंवा वरिष्ठ पातळीवरून थांबविण्याचे अथवा रद्द करण्याचे आदेश प्राप्त झाल्यास सदर कार्यादेश रद्द करण्यात येईल.

१५) सदर काम सुरु असतांना काही बदल झाल्यास त्याप्रमाणे बदल करून सर्वेक्षण कार्य पूर्ण करणे निविदाधारकास बंधनकारक राहील.

१६) दरपत्रक दि. 19/07/2022 ला 4:00 वा. मा. उपायुक्त (सा.), महानगरपालिका अमरावती यांचे कार्यालयात शक्य झाल्यास उघडण्यात येईल.

शहर प्रकल्प अधिकारी
महानगरपालिका अमरावती

प्रतिलिपी :- सिस्टीम मॅनेजर, मनपा अमरावती यांना मनपा portal वर प्रसिद्धीस सादर.

Scanned with CamScanner